CMYK

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

1. येशू ख्रिस्ताचा जन्म ............ येथे झाला.
2. ........... येथे येशू ख्रिस्तांना क्रूसावर चढविण्यात आले.
3. ............. येथे मोहम्मद पैगंबर यांचा जन्म झाला.
4. इस्लाम धर्माचा पवित्र ग्रंथ ............ हा आहे.
5. मोहम्मद पैगंबरांच्या उत्तराधिकाऱ्यांना ............ असे म्हणतात.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे मित्रांबरोबर चर्चा करून लिहा:**

1. येशू ख्रिस्त यांच्या जीवनाबद्दल माहिती लिहा.
2. येशू ख्रिस्तांची शिकवण कोणती?
3. ख्रिश्चन धर्माचा प्रसार कसा झाला?
4. मोहम्मद पैगंबर यांच्या जीवनाबद्दल माहिती लिहा.
5. 'हिजरा' म्हणजे काय?
6. इस्लाम धर्माचे नियम कोणते?

**III. उपक्रम**

1. तुमच्या गावातील चर्च आणि मशिदींना भेट द्या व तेथील धार्मिक आचरणांची माहिती मिळवा.
2. इस्लाम धर्मांचे सांस्कृतिक आचरण समजून घ्या.
3. इस्लाम धर्माचे लोक रमजान सण कसा साजरा करतात ते समजून घ्या.

**IV. प्रकल्प**

1. ख्रिश्चन व इस्लाम धर्माचा प्रसार कसा झाला ते तुमच्या शिक्षकांच्या सहाय्याने समजून घ्या. व त्यावर निबंध लिहा.

©KTBS Not to be republished

त्याने दिल्लीतील कुतुबमीनारजवळ कुवत - अल - इस्लाम ही मशीद बांधली. त्यांने कुतुबमिनारचे बांधकाम सुरु केले पण ते पूर्ण होण्याअगोदरच त्याचा मृत्यू झाला. हसन निजामी, पाक - इ - मुदबिर यासारख्या विद्वानांना त्यांने आश्रय दिला. ताज - उल - मासीर या निजामी साहित्यकृतीत ऐबकबद्दल माहिती आढळून येते.



कुतुब मिनार

**तुम्हाला माहिती असू द्या : कुतुबमिनार**

कुतुबमिनार हा भारतातील अत्यंत उंच मनोरा असुन ऐबकने बांधकाम सुरु केलेला हा मनोरा इल्तमशने बांधून पूर्ण केला. याची उंची 225 फूट असुन या मनोऱ्यावर सुंदर बारीक कलाकुसर केलेली आहे. वरती जाण्यासाठी मनोऱ्याच्या आतून पायऱ्या बांधल्या आहेत.

**इल्तमश :** तुर्कस्तानच्या इलबारी तुर्की समूहातून आलेला इल्तमश हा ऐबकचा गुलाम होता. सुरुवातीला तो ग्वाल्हेरचा राज्यकर्ता होता. अधिकार प्राप्त होताच त्याला दिल्लीचा अमिर गझनीचा एल्तुज नासिरुद्दीन कुब्जा यांच्या विरोधाला तोंड द्यावे लागले.

एल्तुज आणि नासिरुद्दीनचे बंड त्याने यशस्वीरित्या मोडून आपले सिंहासन भक्कम केले. त्यानंतर रणथंबोर, मंडू, ग्वाल्हेर, भिलसा, अजमेर, बनारस, कनोज जिंकले. मंगोलियनांनी चेंगीज खानाच्या नेतृत्वाखाली भारतावर हल्ला केला. पण इल्तमशने तो यशस्वीपणे परतवुन लावला. या त्याच्या कार्याबद्दल बगदादच्या खलिफाने त्याला सुल्तान- ए -आझम किताबासह आधिकारपत्र प्रदान केले. इल्तमश चाणाक्ष राज्यकर्ता होता. त्याने आपले राज्य अनेक इख्त (प्रांत) मध्ये विभागले आणि त्यावर देखरेख करण्यासाठी इख्तेदारांची नेमणूक केली. स्वत:ला मदत करण्यासाठी त्यानी चाळीस गुलामांची एक समिती नेमली होती. प्रधानमंत्री आणि न्यायाधिश सुलतानाला सल्ला देत असत. इल्तमशने भारतात अरेबिक पध्दतीच्या नाण्यांची सुरुवात केली. ही नाणी सोने आणि चांदीची असत. त्याने कुतुबमीनारचे बांधकाम पूर्ण केले. त्याचबरोबर अजमेर येथे भव्य मशिद बांधली.

**रझिया सुलतान**


इल्तमशचा मुलगा रुकुउद्दिन फिरोज हा दुर्बल आणि अकार्यक्षम असल्यामुळे दिल्लीच्या सिंहासनावर त्याची मुलगी रझिया ही प्रथम महिला सुलतानपदी बसली. ती हुशार आणि न्यायप्रिय होती. कायद्याची रक्षणकर्ती होती. स्वत:ला पुरुषाइतके समर्थ सिध्द करण्यासाठी तिला अनेक लढाया लढाव्या लागल्या. ती स्वत: घोड्यावर स्वार होऊन सैन्याचे नेतृत्व करीत असे. तिला 'सुलताना' म्हटले जात असे. तिने सिंध पासुन बंगालपर्यंतच्या विशाल प्रदेशावर आपला दबदबा निर्माण केला.

©KTBS Not to be republished

CMYK

या युद्धामुळे दुर्बल असलेल्या बहामनींचा पूर्णपणे नायनाट झाला. नंतर उमत्तूर चा पाळेगार गंगरायवर स्वारी करुन तो भाग त्याने श्रीरंगपट्टणच्या प्रांतात विलीन केला.

कृष्णदेवरायाच्या युद्ध मोहिमेमध्ये ओरिसाच्या राजपती विरुद्ध झालेले युद्ध महत्त्वाचे आहे. हे युद्ध 1512 ते 1518 या कालावधीत दीर्घकालपर्यंत सुरु होते. कोंडविडू, विजयवाडा व कोंडपल्ली हे प्रदेश त्याने जिंकले, हे प्रदेश म्हणजे, ओरिसाच्या गजपती प्रतापरुद्रदेवाचे दक्षिणेकडील प्रदेश होत. ओरिसाचा गजपती कृष्णदेवरायाला शरण आला व त्याने आपल्या मुलीचा विवाह कृष्णदेवरायाबरोबर लावून दिला. विजयपूरच्या इस्माईल आदिलशहाने 1520 मध्ये रायचूर जिंकले रायचूरसाठी विजयनगर




व विजयपुरचा सुलतान यांच्यामध्ये घनघोर युद्ध झाले. पोर्तुगीजांनी या युद्धात विजयनगरला मदत केली. यापूर्वी गोवा मिळविण्यासाठी कृष्णदेवरायाने पोर्तुगीजांना मदत केली. होती. युद्धामध्ये रायचूर कृष्णदेवरायाच्या ताब्यात आले. याच्या कारकीर्दीत विजयनगरचे साम्राज्य उत्तरेकडे कृष्णा व गोदावरी नदी पर्यंत, पूर्वेकडे बंगालचा उपसागर पश्चिमेकडे अरबी समुद्र व दक्षिणेकडे हिंदी महासागरा पर्यंत पसरलेले होते.

**कृती**

तेनाली रामकृष्णाच्या चातुर्य कथा वाचा.

कृष्णदेवराय कुशल प्रशासक व युद्धात निपुण होता. राज्यकारभाराबद्दलचे त्याचे विचार व त्याचे व्यवहारज्ञान हे त्याने लिहिलेल्या ''आमुक्त माल्यदा'' या तेलुगु कृतीवरुन समजते. त्याने शेतीचा विस्तार व विकासासाठी पाणीपुरवठ्याची सोय करून दिली. पोर्तुगीजांबरोबर सलोख्याचे संबंध ठेऊन विदेशी व्यापार वाढविला. विवाहावरील कर त्याने रद्द केला. तो कला व साहित्याचा भोक्ता होता. व

©KTBS Not to be republished

मदत करीत असत. नाडू म्हणजे सध्याचे जिल्हयाचे स्वरुप, नाडगौडा त्यांचे प्रमुख असत तर शहरांचा राज्यकारभार पट्टणस्वामी पहात असत. राजाला सर्वोच न्यायाधीश म्हणून आधिकार होते. प्रांतामध्ये प्रांताधिकारी न्यायनिवाडा करीत असत. कठोर शिक्षा दिल्या जात असत.

विजयनगरचे सैन्य : विजयनगरचे सैन्य सामर्थ्यशाली होते. कायमची तुकडी, मांडलिकांची सुसज्ज सैन्य तुकडी असे. सैन्यात पायदळ, अश्वदळ, गजदळ आणि तोफखाना असे विभाग होते. 1368 च्या लढाई पासून तोफखान्याचा वापर केला गेला. त्यात हत्तीचा सहभाग प्रमुख होता. विजयनगरच्या सैन्यात अरबी घोडे हे प्रमुख आकर्षण होते. आरमारही होते. कोणत्याही जाती धर्माच्या व्यक्तीस योग्यतेच्या बळावर सैन्यात स्थान दिले जात असे. शेतकरी (वक्कलिग) आणि बेरड समाज हे युध्दाच्या वेळी किल्ल्यांच्या पहाऱ्याचे काम करीत असत. विजयनगर साम्राज्याचे वैशिष्ट्य म्हणजे नायक किंवा रखवालदार यांना राजाला मदत देण्याच्या अटीवर जमीनी बहाल केल्या जात असत.

सामाजिक व्यवस्था : समाज व्यवस्था चातुर्वर्ण्यावर आधारित होती. व्यवसायावर आधारित जातीपध्दत देखील अस्तित्वात होती. कलाकार, भांडी तयार करणारे, सोनार, लोहार, विणकर, चर्मकार यांची संख्या समाजात लक्षणीय होती. सती, बालविवाह आणि देवदासी पध्दत अस्तित्वात होती. सामान्यपणे एकपत्नित्व पध्दत रुढ होती. राजे आणि श्रीमंतामध्ये बहुपत्नित्व पध्दत प्रचलित होती. स्त्रियांना मानाचे स्थान होते. राजवाड्याच्या पहारेकरी म्हणून स्त्री कुस्तीपटूना नियुक्त केले जात असे. व्यापार उद्दीमात देखिल स्त्रियांचा सहभाग होता. होळी दसरा आणि दीपावली हे सण मोठ्या प्रमाणात साजरे केले जात असत. दसरा फार मोठ्या प्रमाणात आणि दिमाखाने, राजकीय छत्रछायेखाली साजरा होत असे नृत्य आणि संगीत खूप लोकप्रिय होते.

उपक्रम :

विजयनगर काळातील दसरा आणि आताचा म्हैसूर दसरा उत्सव यांची तुलना करा.

आर्थिक व्यवस्था : विजयनगरची आर्थिक स्थिती भक्कम होती. जमिनीवरील कर हा राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. शेतकरी आपल्या उत्पन्नाचा 1/4 भाग कराच्या स्वरुपात देत असत. व्यवसाय कर, घरफ़ाळा, वहातूक कर, बाजार कर, वाणिज्य कर, आयातकर, निर्यात कर, मांडलिकांच्याकडून मिळणारी खंडणी ही उत्पन्नाची इतर साधने होती. कृषिव्यवसाय हा अर्थव्यवस्थेचा कणा होता. शेतकरी वर्षाकाठी दोन पिके (रब्बी आणि खरीप) घेत असत. मका, नाचणा, गहू, भात, व्दिदल धान्ये, तीळ, डाळी, बाजरी, शेंगा, कापूस, ऊस, नारळ आणि मसाल्याचे पदार्थ ही मुख्य पिके होती. केळी आणि भाजीपाला यांची लागवड केली जात होती. विजयनगरच्या राज्यकर्त्यांनी शेतीला उतेजन देण्यासाठी विहिरी, तलाव आणि कालवे बांधून पाणीपुरवठ्याची सोय केली. त्यांच्या काळात गणी, गुत्तीगे, सिध्दाय, वर आणि गडी इ. जमीनधारणेच्या पध्दती अस्तित्वात होत्या.



©KTBS Not to be republished

CMYK

उपक्रम :

दुड्डु, कासू अथवा इतर नाणि किंवा त्यांची चित्रे गोळा करा

विजयनगर साम्राज्याच्या काळात व्यापार आणि उद्योगधंद्यात प्रचंड प्रगती झाली होती. मिरी, लवंग,वेलदोडा इ. मसाल्याचे पदार्थ, खडीसाखर, कस्तुरी, कच्चे लोखंड, हिरे, चंदन, सुगंधी अत्तरे निर्यात केली जात असत. वस्त्रोद्योग अस्तित्वात होता. सोन्याचे वराह, गद्यान, पगोड, आणि चांदीचा तारा, तांब्याचा पण, ॲल्युमिनियमचा दुड्डु आणि कासू ही नाणी चलनात होती.

तुम्हाला माहित असू द्या

अनंतपूर जिल्हयात गुत्तीजवळील वज्रकरुर हे हिऱ्यांचे केंद्र होते. कालिकतमध्ये माणके प्रचंड प्रमाणात मिळत होती. भटकळ कच्च्या लोखंडासाठी प्रसिध्द होते. पुलिकतमध्ये गुलाबाच्या फूलापासून सुगंधी द्रव्ये तयार केली जात असत. पेस या पोर्तुगीज प्रवाशाने म्हटले आहे की रोज वेगवेगळ्या ठिकाणी बाजार भरत असे. विरुपाक्ष, कृष्णा, पानसुपारी, वरदराज्यवर्मा, अच्युत, विठ्ठल आणि माल्यवंत या सात प्रमुख बाजारपेठा होत्या.

हे तुम्हाला माहित आहे का ?

बंकापूर, भटकल, गोवा, शिवनसमुद्र, रायचूर, कांची, चिदंबरम, मदुराई, रामेश्वर ही या काळातील प्रमुख व्यापारी केंद्रे होती. जावा, सुमात्रा, बोर्नियो, चीन, अरेबिया, पर्शिया, पूर्व आफ्रिका, ॲबेसेनिया, पोर्तुगाल या देशांबरोबर व्यापार सुरु होता. गोवा, चौल, होन्नावर, बारकूर, मंगलूर, नीलेश्वर, भटकल, कल्लीकोटे, मच्छलीपट्टण विशाखपट्टण ही व्यापारी बंदरे होती. कापड, तांदूळ, साखर व मसाल्याचे पदार्थ यांची निर्यात होत असे. घोडा, हत्ती, तांबे, पारा, चायना सिल्क व वेलवेट कापड इ. वस्तूंची आयात होत असे.

भटकळ, होन्नावर, मंगळूर ही विजयनगर साम्राज्यातील प्रमुख बंदरे होत. अरब राष्ट्रे, चीन, पोर्तुगाल इ. देशांशी साम्राज्याचे व्यापारी संबंध होते.

धार्मिक व्यवस्था : विजयनगर साम्राज्याची स्थापना हिंदू धर्म आणि संस्कृतीच्या रक्षणासाठी झाली असली तरी इतर धर्मांना संरक्षण आणि प्रोत्साहन दिले जात असे. या काळात श्रीवैष्णव आणि जैन यांच्यातील धार्मिक मतभेद मिटले जाउन ते गुण्यागोविंदाने राहू लागले. बुक्करायाने त्यांना एकमेकांना आदर देण्यास प्रोत्साहित केले. याचा उल्लेख आपल्याला श्रवणबेळगोळच्या शिलालेखात आढळतो. प्रारंभीचे विजयनगरचे राज्यकर्ते शैव आणि वीरशैव धर्म मानत असत. नंतरचे राज्यकर्ते वैष्णव धर्माला मानू लागले. मुस्लीमांसाठी मशिदी आणि दर्गे बांधले गेले. त्यांना सैन्यात भरती करुन घेतले जात असे. विजयनगरच्या राज्यकर्त्यांनी ख्रिश्चन धर्माला देखील प्रोत्साहन दिले. राज्यात चर्च बांधावयास परवानगी दिली.

हे तुम्हाला महित आहे का?


विजयनगरच्या साम्राज्यमध्ये ख्रिश्चन, ज्यू, मुस्लिम अथवा हिंदू असे सर्वजण गुण्यागोविंदाने रहात असत. - परदेशी यात्रेकरू बार्नोसा

साहित्य : साम्राज्यात असलेल्या शांती, सुव्यवस्था आणि धार्मिक प्रगतीमुळे साहित्याच्या भरभराटीला वाव मिळाला. कन्नड, संस्कृत, तेलगू आणि तामिळ भाषेत साहित्य रचना केल्या गेल्या. रत्नकरवाणीने 'भरतेश वैभव', चामरसाने 'प्रभुलिंगलीले', कुमार व्यासाचे 'गदुगिनभारत', या कन्नड भाषेतील मुख्य रचना होत्या. सोमनाथाच्या तेलगू कृतीचे भीमकवीने कन्नड मध्ये 'बसवपुराण' असे भाषांतर केले. वीरशैवांची वचने संकलित करण्यात आली. 'शून्यसंपादने' या कृतीत वीरशैवांची वचने अंतर्भूत आहेत.

©KTBS Not to be republished

CMYK

गिलान येथे झाला. इजिप्तमधील कैरो येथे राहून त्याने इस्लाम धर्मशास्त्र आणि कायद्याचा अभ्यास केला. त्याने अरेबियन आणि पर्शियन भाषेत पांडित्य मिळविले. त्याने हुमायुन, नझमशाहा, बहामनी राज्यकर्ता, तिसरा महमदशहा यांच्या कारकिर्दीत मंत्री आणि वजीर म्हणून कार्य केले. आपल्या सुव्यवस्थित राज्यकारभाराने आणि विजयाने त्याने त्याने बहामनी राज्याला नाव प्राप्त करून दिले. गवाणाने कोकण, गोवा आणि बेळगांव 1469 मध्ये काबीज केले. त्यानंतर ओडिशा आणि कोंडविदू प्रदेश जिंकले. 1481 मध्ये कांचीवर आक्रमण करून तेथील अपार संपत्ती लुटली. बहामनी राज्याच्या सर्वांगिण प्रगतीला कारणीभूत ठरलेल्या गवाणाविरोधात शत्रूनी कारस्थान रचून त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून 1481 मध्ये त्याचा शिरच्छेद केला. नंतर बहामनी राज्य दुबळे होउन त्याची शकले पडली.




**बहामनी राज्याचे तुकडे**

↓

- **अहमदनगर** (निजामशाही)
- **विजापूर** (आदिलशाही)
- **वऱ्हाड** (इमादशाही)
- **बिदर** (बेरीदशाही)
- **गोवलकोंडा** (कुतुबशाही)

©KTBS Not to be republished

त्यामध्ये भारतातील अनेक श्रेष्ठ कायदेतज्ञांचा समावेश होता. जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, मौलाना अबुल कलम आझाद, सी. राजगोपालाचारी, के. एम. मुंशी, टी. टी. कृष्णाम्माचारी, श्रीमती सरोजिनी नायडू, श्रीमती सुचेता कृपलानी यांच्यासह एस निजलिंगप्पा, के.सी. रेड्डी, केंगल हनुमंतय्या, टेकुर सुब्रम्हण्यम इ. कर्नाटकातील विख्यात व्यक्तीही सामील झाल्या होत्या.

रचना समिती (**Drafting Committee**) **:** देशातील सर्व बाबींचा तसेच घटकांचा काळजीपूर्वक अभ्यास करून घटना समितीने विविध समित्या स्थापन केल्या. त्यापैकी सर्वात महत्वाची म्हणजे रचना समिती होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या समितीचे अध्यक्ष होते. याव्यतिरिक्त एन. गोपालस्वामी अय्यंगार, अल्लडी कृष्णस्वामी अय्यर, के. एम. मुंशी, टी. टी. कृष्णम्माचारी व अनेक ख्यातनाम, मुत्सद्दी राजकारण्यांचा सहभाग होता. या समितीला मसूदा समिती असेही म्हणतात.

घटनेची निर्मिती (**Framing of the Constitution**) **:** 11 डिसेंबर 1946 पासून दोन वर्षे, अकरा महिने व 18 दिवस घटना निर्मितीचे कामकाज चालले. यादरम्यान घटनेतील विविध विषयांची सखोल चर्चा झाली. निर्मिती समितीने या कालावधीमध्ये 145 सभाघेतल्या.घटनेचा मसुदा तयार करून घटनेची निर्मिती करण्यात आली त्याकरिता जगातील विविध देशांच्या घटनांचा बारकाईने अभ्यास करण्यात आला. 1909,1919 व 1935 मध्ये ब्रिटीश सरकारने अवलंबलेले कायदे, त्यांची संसदीय व्यवस्था, अमेरिकेचे 'बील ऑफ राइट्स' (Bill of rights), आयर्लंडची 'अधिकृत सामाजीक तत्वे' या सर्वांचा आधार घेवून घटनेचा आराखडा तयार करण्यात आला. 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय राज्यघटनेचा स्विकार झाला. 26 जानेवारी 1950 रोजी घटना अंमलात आली म्हणून 26 जानेवारी हा दिवस गणतंत्र दिन (प्रजासत्ताक) म्हणून संपूर्ण भारतभर राष्ट्रीय उत्सवाच्या स्वरुपात साजरा केला जातो. प्रौढ मतदान पध्दतीचा (Adult Franchise system) अवलंब करून नवीन मतदार याद्या बनविण्यात आल्या. 1952 साली भारतात पहिल्या लोकसभा निवडणूका घेण्यात आल्या.

> **हे तुम्हाला माहित असू द्या**
>
> 26 जानेवारी 1930 रोजी लाहोर येथे झालेल्या अधिवेशनामध्ये भारतासाठी 'संपूर्ण स्वराज्य' (Total Freedom) ही संकल्पना मांडण्यात आली, आणि या घटनेचे स्मरण म्हणून 26 जानेवारी 1950 रोजी आपली घटना अंमलात आणली गेली.

घटनेची प्रस्तावना, पूर्वपिठीका किंवा उद्देशपत्रिका **: (Preamble)**


जगातील विविध देशांच्या घटनांचा तौलनीक अभ्यास करून त्यातील उत्तमोत्तम विषयांचे एकत्रीकरण करून भारताची घटना तयार करण्यात आली. भारताच्या घटनेला स्वत:ची, स्वतंत्र अशी एक प्रस्तावना देण्यात आली. त्यामध्ये घटनेची मूलभूत धोरणे आणि आदर्शांचा समावेश करण्यात आला. आपली घटना म्हणजे मूल्ये, तत्वे, रचना व ध्येयांची गोळाबेरीज आहे. ही घटना भारतीय जनतेच्या तीव्र इच्छा आकांक्षावर तसेच आदर्शांवर आधारित आहे.ही प्रस्तावना म्हणजेच 13 डिसेंबर 1946 रोजी नेहरुनी प्रस्तावित केलेल्या ठरावाचा एक भाग आहे. 22 जानेवारी 1947 रोजी घटना समितीने तिला मान्यता दिली. त्यावेळी भारत अजुनी एकसंघ होता. नंतर भारताची विभागणी होवून 15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला. नेहरुंच्या या ठरावामध्ये थोडासा बदल करून भारतामध्ये सार्वभौम, समाजवादी, प्रजासत्ताक स्थापन करण्याचे ठरले. आपल्या घटनेने प्रत्येकाला सामाजिक, आर्थिक, राजकीय न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच मागासवर्गीयांना व अल्पसंख्यांकाना पुरेसे संरक्षण देण्याचे वचन दिले आहे.

©KTBS Not to be republished

पश्चिम ते पूर्व 400 कि. मी.इतकी आहे. उत्तर कॅनरा जिल्हयातील कारवार पश्चिम टोकाला आहे. तर कोलार तालुक्यातील मुळबागल तालुका हा पूर्व टोकाला आहे. कर्नाटकाला भू आणि जलसीमा सुध्दा आहेत. पश्चिमेला अरबी समुद्र, उत्तरेकडे महाराष्ट्र राज्य, पूर्वेकडे आंध्र प्रदेश, दक्षिण आणि आग्नेयेला तामिळनाडू, नैर्ऋत्येला केरळ, वायव्येला गोवा या राज्याच्या सीमा लाभलेल्या आहेत. कर्नाटक राज्याचा आकार काजूसारखा आहे.

**विस्तार–**

कर्नाटकाचे क्षेत्रफळ 1,91,791 चौरस कि. मी. आहे. आकारमानानुसार हे भारतातील आठवे राज्य आहे. 2011 च्या जनगणनेनुसार 6,11,30704 लोकसंख्या असल्यामुळे नववे स्थान प्राप्त झाले आहे. भारताचा 5.83% इतका भूभाग कर्नाटकाने व्यापला आहे.




©KTBS Not to be republished


CMYK

ठळक व्दिपे आहेत. समुद्रकिनाऱ्या लगतच्या लोकांचा मासेमारी हा प्रमुख व्यवसाय आहे. कृषि व्यवसाय हा दुसरा महत्वाचा व्यवसाय आहे. काजू, नारळ, सुपारी, वेलदोडा आणि भात यासारखी पिके पिकविली जातात. दक्षिण कॅनरा, उत्तर कॅनरा, उडपी हे कर्नाटकाच्या समुद्रतटावरील जिल्हे आहेत.

2. मलनाडूचा पर्वतीय प्रदेश :

आपल्या राज्यातील पश्चिम घाटाचा उल्लेख मलनाडू अथवा पर्वतमय प्रदेश असा केला जातो. यांना सह्यांद्रि पर्वत देखील म्हटले जाते. मलनाड हा प्रदेश किनारपट्टीला समांतर उत्तर ते दक्षिणेपर्यंत विस्तारला आहे. या पर्वतरांगामध्ये पश्चिमेकडे खडे उतार तर पूर्वेकडे उंच टेकड्या असल्यामुळे या प्रदेशाला घाट म्हटले जाते. त्याची लांबी 650 कि. मी. तर रुंदी 50 ते 76 कि. मी. आहे. समुद्रसपाटीपासूनची उंची साधारणतः 900 ते 1500 मी. आहे. या डोंगररांगा अरबी समुद्रावरुन वहाणाऱ्या पावसाच्या ढगांना अडवितात त्यामुळे या ठिकाणी 200 सें. मी. पेक्षा अधिक पाऊस पडतो. या भागातील सर्वात उंच पर्वत म्हणजे मलयगिरी, कुद्रेमुख, कळहट्टगिरी, रुद्रीगिरी आणि देवरिम्मन बेट्ट हे सगळे पर्वत चिक्कमंगळूर जिल्ह्यात आहेत. याशिवाय बल्लाळ, रायनदूर्ग, मेर्तिगुड्ड, पुष्पगिरी आणि कोडचाद्री हे पश्चिम घाटातील इतर उंच पर्वत आहेत. हा पर्वत बाबाबुडनगिरी पर्वतावर असून याला चंद्रद्रोण पर्वत असे देखील म्हटले जाते.

> **तुम्हाला हे माहित असू द्या**
>
> - न्यू मंगळूर या बंदराला कर्नाटकाचे प्रवेशव्दार असे म्हणतात.
> - सेंट मेरी बेटाला स्थानिक तोन्सेपार म्हणून संबोधतात.
> - मुरडेश्वर जवळील नेत्राणी बेटावर कबुतरांची संख्या अधिक आहे. त्यामुळे त्याला कबुतरबेट म्हटले जाते.




पूर्वेकडील मैदाने ते किनारपट्टीची मैदाने या पलीकडून जाणाऱ्या पश्चिम घाटातील रस्त्यांना पर्वतीय रस्ते किंवा घाटमाथा असे म्हटले जाते. यातील प्रमुख घाट विभाग म्हणजे –

1. चारमडी घाट : हा घाट मंगळूर आणि चिक्कमंगळूरला जोडतो.
2. शिराडी घाट : हा हासन ते सकलेशपूर आणि मंगळूर या मार्गांना जोडतो.
3. आगुंबे घाट : हा शिमोगा आणि उडपीला जोडतो.
4. हुलीकल घाट : हा शिमोगा आणि कुंदापूरला जोडतो.

©KTBS Not to be republished

CMYK



मलयगिरी



मधुगिरी - अखंड शिला पर्वत

**कृती**

तुमच्या जिल्याच्या स्वाभाविक वैशिष्ट्यांबद्दल माहिती लिहा.

2. दख्खनचे पठार : हा प्रदेश उत्तरेकडे तुंगभद्रा नदीच्या खोऱ्यापासून ते दक्षिणेकडील चामराजनगर जिल्ह्यापर्यंत पसरला आहे. हे मैदान लाल मातीचे आहे. ही भूमी उंचसखल असून उंची 900 ते 975 मी. इतकी आहे. उत्तरेकडील मैदानापेक्षा हा प्रदेश उंच असून पूर्वेकडे उताराचा आहे. बिळगिरी रंगन बेट्ट मलय महादेश्वर, नारायणदूर्ग, नंदी, शिवगंगा, सवनदूर्ग इत्यादि या मैदानावरील महत्वाच्या टेकड्या आहेत. मधुगिरी ही आशियातील सर्वात मोठी अखंड पाषाणातील (monolethichil) टेकडी आहे. चिक्कबळ्ळापूर जिल्ह्यातील नंदी, चन्नकेशव, केवलदूर्ग, स्कंदगिरी (हरिहरेश्वर टेकडी), मंड्यातील आदी चुंचनगिरी, बेळगिरीरंगय्या, मलयमहादेश्वर, चामराज जिल्ह्यातील हिमदगोपाल स्वामी, म्हैसूर जिल्ह्यातील चामुंडी या टेकड्या महत्वाच्या आहेत. हा प्रदेश पर्जन्य छायेचा आहे. कावेरी, पालार, आणि पेन्नार या प्रदेशातून वहाणाऱ्या नद्या आहेत. नाचणी, भात, ऊस, शेंगा, तुती, भाज्या, वेगवेगळ्या प्रकारची फुले आणि फळे यांचे उत्पादन या भागात मोठ्या प्रमाणात होते. दावणगिरी, चित्रदूर्ग, तुमकूर, कोलार, मंड्या, म्हैसूर आणि चामराजनगर हे दख्खनच्या पठारावरील जिल्हे आहेत.

## स्वाध्याय


**I.** खालील रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा.

1. ................ हे बेट माल्पेजवळ आहे.
2. ................. यांना सह्यांद्रि म्हटले जाते.
3. आगुंबे घाट .............. व ................ यांना जोडतो.
4. ................ जिल्हा कर्नाटकाचे काश्मीर म्हणून ओळखला जातो.

© KTBS Not to be republished

पडतो. या पावसामुळे कॉफी पिकाला चांगली फुले येतात म्हणून याला 'चेरी ब्लासम रेन' म्हटले जाते. शिवाय आंब्याचे पीक परिपक्व होण्यास मदत होते. म्हणून याला कानडीमधे 'माविन हुईल' म्हटले जाते. सरासरी पावसाच्या 7% पाऊस या मोसमात पडतो.


2. पावसाळा : या मोसमाला नैर्ऋत्य मान्सून वारे असेही म्हणतात. अरबी समुद्रावरुन वाहणारे बाष्पयुक्त वारे पश्चिमघाट अडवितात परिणामी मुसळधार पडतो. जसजसे आपण पूर्वेकडे जावे तसतसे पावसाचे प्रमाण कमी होते. त्यामुळे पूर्वेकडचे मैदान पर्जन्यछायेच्या प्रदेशात परावर्तीत होते. आगुंबे इथे सर्वात जास्त पाऊस पडतो म्हणून या ठिकाणाला दक्षिणेची चेरापुंजी म्हणतात. त्याच्या खालोखाल भागमंडल आणि हुलीकल ही जास्त पाऊस पडणारी ठिकाण होय. चित्रदुर्ग जिल्ह्यातील चेलाकेरीजवळील 'नायकनहट्टी' हे सर्वात कमी पावसाची नोंद असलेले ठिकाण आहे. या ऋतूमधे संपूर्ण राज्यात जास्त उष्णतामाना बरोबरच हवेमधे आर्द्रतेचे प्रमाण जास्त असते. सर्वत्र ढगाळ वातावरण असते. कर्नाटकामधे 80% पाऊस पडतो. रबी पिकांना याची मदत होते.




3. मान्सूनच्या परतीचा मोसम : याला ईशान्य मान्सून वाऱ्याचा काळ म्हटले जाते. उष्णतामानात वाढ अन हवेच्या दाबात घट निर्माण झाल्यामुळे वारे ईशान्येकडून नैर्ऋत्येकडे वाहातात. हे वारे कोरडे असतात कारण हे जमिनीकडून वाहातात. बंगालच्या उपसागरावरुन वाहाणारे वारे दख्खनच्या पठारावरील काही जिल्ह्यांना थोडासा पाऊस आणतात. नोव्हेंबर डिसेंबर दरम्यान बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या वादळामुळे पाऊस पडतो. या मोसमामधे एकूण पावसाच्या बारा टक्के इतका पाऊस पडतो. या काळात हवामानात चढउतार असतो.

©KTBS Not to be republished

3. लॅटेराइट सॉईल किंवा बाजूकडील माती : ज्या ठिकाणी मुसळधार पाऊस आणि उच्च तपमान असते तेथे या प्रकारची माती आढळते. चुनखडी आणि सिलिका पावसाच्या पाण्यात विरघळतात आणि त्याचे खाली थर निर्माण होतात. लोह आणि ॲल्युमिनियम अविद्राव्य असल्यामुळे ते वरच्या थरात राहतात. ही माती पावसात मऊ तर उन्हाळ्यात कोरडी होते. लॅटेराइट दगड (जांभा दगड) तयार होतात. या दगडाच्या विटा काढून बांधकामासाठी वापर केला जातो. या मातीत काजू, कॉफी, चहा, वेलदोडा, मिरी, रबर, नारळ आणि इतर पिकांची लागवड होते. कॅनरा, उडपी, दक्षिण कॅनरा, कूर्ग, चिक्कमंगळूर, शिमोगा आणि बेळगांवमधे या प्रकाराची माती जास्त आहे. तर बिदर, कोलार, बेंगलोर, ग्रामीण आणि गुलबर्गा येथे काही प्रमाणात ही माती आढळते.




4. गाळाची माती : नदी आणि समुद्रामुळे भूस्वरुपाची झीज होते, त्या झीजेमुळे या प्रकारची माती तयार होते. त्यामुळे समुद्रतटीय जिल्हे, उडपी, दक्षिण कॅनरा आणि उत्तर कॅनरा या ठिकाणी अशाप्रकारची माती आढळते. ही माती वाळू आणि चिकण मातीने बनलेली असते. या मातीमधे सेंद्रिय पोषकत्व जास्त असते. भात, काजू, नारळ, सुपारी यासारखी पिके या मातीत उत्तम प्रकारे येतात.

## नैसर्गिक वनस्पती

वेगवेगळ्या वनस्पती आणि वृक्षांच्या स्वाभाविक वाढीला नैसर्गिक वनस्पती असे म्हणतात. कर्नाटकामधे भिन्न प्रकारच्या वनस्पती आणि त्यांच्या जाती आहेत. पर्यावरणाचा समतोल राखण्याचे महत्वाचे कार्य या वनस्पती करतात. झाडामुळे इमारतीचे लाकूड, जळण, कारखान्यांना कच्चा माल, औषधी वनस्पती, मध, बांबू, वेत इ. मिळतात. जंगले ही प्राण्यांची नैसर्गिक वस्तीस्थाने आहेत. वाघ, सिंह, चित्ता, जंगली म्हैस, हत्ती, हरण, मोर इ. प्राणी कर्नाटकाच्या जंगलात आढळतात. जंगले मनोरंजनाची आणि प्रवासी स्थळे आहेत. जंगले पर्यावरणाचे प्रदूषण रोखतात.

©KTBS Not to be republished


CMYK

विशेषत: कर्नाटकात आढळणाऱे चंदन वृक्ष सुगंधी अत्तरे, नाजूक नक्षी कामाच्या वस्तू, साबण आणि औषध निर्मितीसाठी उपयुक्त आहेत. त्यामुळे याची निर्यात देशभरातच्च नव्हे तर संपूर्ण जगात केली जाते. यामुळेच कर्नाटकाला 'चंदनाची भूमी' असे म्हटले जाते.

वनस्पतीचे प्रकार :

पावसाची विभागणी, भूपृष्ठाचे स्वरुप आणि मातीच्या प्रकारावरुन कर्नाटकातील वनस्पतीचे वेगवेगळे विभाग करण्यात आले आहेत. सदाहरित अरण्ये, पानझडीची अरण्ये, संमिश्र अरण्ये, उष्ण कटिबंधातील कुरणे इ. प्रकार होत.

1. सदाहरित अरण्ये : ज्या भागामधे 250 से. मी. पेक्षा जास्त पाऊस पडतो तेथे सदाहरित अरण्ये आढळतात. उदा. पश्चिम घाटाचा उतार मुसळधार पाऊस आणि उच्च तपमानामुळे झाडे उंच वाढतात. त्याच्या फांद्या विस्तारतात. ही जंगले घनदाट असल्यामुळे सूर्याची किरणे जमिनीपर्यंत पोहचत नाहीत. उंच सरळ बुंध्यांचे वृक्ष, शिसम, महोगनी, टीक, साल इ. वृक्ष आढळतात. या झाडांच्या बुंध्याशी दाट झुडपे वाढतात. वेगवेगळ्या प्रकारची झुडपे, लवंग, वेलदोडा, दालचिनी आणि औषधी वनस्पती मुबलक प्रमाणात वाढतात. या प्रकारची अरण्ये उ. कॅनरा, द. कॅनरा, शिमोगा, हासन, चिक्कमंगळूर, चामराजनगर आणि कूर्ग जिल्ह्यात आढळतात.





2. पानझडीची अरण्ये : हिवाळ्यानंतर दमटपणामुळे या वनस्पतींची पाने गळतात. वसंत ऋतूमधे पुन्हा पालवी फुटते. यांना पानझडीचे वृक्ष म्हणतात. अशा प्रकारची अरण्ये 60 ते 120 से. मी. वार्षिक पाऊस पडणाऱ्या ठिकाणी आढळतात. उदा. चिक्कमंगळूर, म्हैसूर, चामराजनगर, हासनचा पूर्वभाग तुमकूर, चिक्कबळ्ळापूर, कोलारचा दक्षिण भाग, मंड्या, रामनगर, बेंगलोर ग्रामीण या जिल्हयात आढळतात. टीक, होन्ने, महोगनी, निम, आंबा,

Not to be republished ©KTBS

तुम्हाला हे माहित आहे का?

- बंडीपूर, भद्रा, नागरहोळे, दांडेली आणि बिळीगिरी रंगनाथ देवालयाचा भाग हे कर्नाटकातील पाच प्रमुख वाघ संरक्षण प्रकल्प आहेत.
- रंगनतिट्टू हे कर्नाटकातील प्रसिद्ध पक्षीधाम आहे.




घाटाला जैव वैविध्याने संपन्न स्थळ म्हणून स्थान लाभले आहे. भारताच्या एकूण टक्केवारीत 25% प्राणीप्रजाती असून 10% वाघांची संख्या कर्नाटकामधे आढळून येते. त्याचबरोबर इथे चित्ता, अस्वल, गवा, सांबर, हरीण, डुक्कर, सार्लिद्र शिवाय साप आणि रंगीबेरंगी पक्षी आढळून येतात. पश्चिम घाटाच्या मध्यभागाला 'मलनाडू' म्हटले जाते. त्या भागामधे नैसर्गिक जैव वैविध्याची परंपरा अजूनही टिकून आहे. या ठिकाणी जास्तीत जास्त प्रजाती आढळतात. कर्नाटकामधे जंगलाचे वर्गीकरण तेथील आढळणाऱ्या प्राण्यावरुन सहा विभागात केले आहे. हे म्हणजे:

1 किनारपट्टीचा प्रदेश- उत्तर कॅनरा आणि बेळगांव

2 संह्याद्रि पर्वत रांगा- बाबा बुडनगिरी पर्वत, बिळगिरी रंगय्या स्वामी टेकड्या, महादेश्वर पर्वत, गोपालस्वामी टेकड्या इ. दक्षिण पठारावर आहेत.

3. उत्तरेकडील पठारावरील जंगली प्राण्यांचे मुख्य वस्तीस्थान राणीबेन्नूर

4 कर्नाटकामधे पाच राष्ट्रीय उद्याने, पांच पक्षीधाम आणि 27 जंगली प्राण्यांची वस्तीस्थाने आहेत.

©KTBS
Not to be republished

CMYK

# प्रकरण 4
# कर्नाटकातील जलसंपदा

**या पाठाच्या अभ्यासाने खालील गोष्टी जाणून घ्याल**

- कर्नाटकातील महत्वाच्या नद्या.
- कर्नाटकातील पाटबंधारे.
- जलविद्युत प्रकल्पांचे महत्व.
- कर्नाटकातील प्रमुख धरणे.
- प्रमुख नद्यांच्या जलवाटपाबद्दलचे वाद आणि नदी जल संरक्षणाचे महत्व.

## कर्नाटकातील नद्या :


नद्या या पाणीपुरवठ्याची मुख्य साधने आहेत. कर्नाटकात अनेक नद्या आहेत. कर्नाटकातील नद्यांचे त्यांच्या प्रवाहावरुन दोन विभाग केले आहेत. पूर्ववाहिनी आणि पश्चिमवाहिनी

**तुम्हाला हे माहित असू द्या**

कावेरी नदीपात्राच्या तीन ठिकाणी धबधबे चुनचुनकट्टी, शिवनसमुद्र आणि होगेनकल तर श्रीरंगपट्टण, शिवनसमुद्र आणि श्रीरंग ही तीन बेटे निर्माण झाली आहेत.

**तुम्हाला हे माहित असू द्या**

- मलप्रभा आणि कृष्णा नदीचा संगम कुडलसंगम येथे होतो.
- कुडली येथे तुंगा आणि भद्रा या नद्यांचा संगम झाला आहे.
- कृष्णराजसागर येथे हेमावती नदी कावेरी नदीला मिळते.




Not to be republished ©KTBS


CMYK

करता येईल नंतरच्या काळात पंचवार्षिक योजना दरम्यान अनेक जलविद्युत प्रकल्प उभारण्यात आले. जलविद्युतशक्ती निर्मितीमधे कर्नाटक राज्य प्रथम स्थानावर आहे.

### कर्नाटकाची मुख्य जलविद्युत केंद्र

शिवनसमुद्र, शिमशा (कावेरी नदी), शरावती, लिंगनमक्की, गिरसप्पा आणि महात्मा गांधी जलविद्युत प्रकल्प (शरावती नदी), सुपा, नागझरी, कद्रा आणि कोडसक्की (काळी नदी) वराही आणि मारी, दरी (वराही नदी), भद्रा, तुंगभद्रा, घटप्रभा आणि आलमट्टी (कृष्णा नदी) इ. योजना प्रमुख आहेत.

कर्नाटकातील प्रमुख जलविद्युत निर्मिती प्रकल्प




### नदीजलवाटप विवाद

नदीचे पात्र वहात असताना ती अनेक राज्यातून प्रवास करते. त्यावेळी उभय राज्यांमधे समंजसपणा व सलोखा निर्माण होतो. पण दुर्दैवाने नदीचे प्रवाह वेगवेगळया राज्यातून वहाताना पाण्याच्या वापरावरुन नवीनच वादाला तोंड फुटत आहे. कावेरी आणि कृष्णा या नद्यांच्या पाणीवाटपावरुन निर्माण झालेला तंटा हा त्यापैकीच एक आहे. कावेरी नदी, कर्नाटक, तामिळनाडू, केरळ आणि पाँडिचेरी या राज्यातून वहाते. कावेरीच्या पाण्यावरुन कर्नाटक आणि तामिळनाडूचा विवाद खूप जुन्या शतकांपासूनचा आहे. आजही तो ज्वलंत प्रश्न आहे. कृष्णा नदी देखील महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेशातून वहाते. त्यामुळे या प्रदेशातही जलवाटपावरुन तणाव निर्माण होत आहेत.

©KTBS Not to be republished

## स्वाध्याय

**I.** खालील रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा

1. कावेरी नदीचा उगम कोडगू जिल्ह्यातील .............. येथे होतो.